# वार्षिक अहवाल
# २०२०-२०२१





स्थापना: २०१४
रजि. क्र. F/45073/PUNE
महा. 1991/2014/पुणे

## सुमंत्र सायकॉलॉजिकल कौन्सेलिंग सेंटर
## कोथरूड, पुणे

प्रिय वाचक ,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　६ ऑगस्ट २०२१

अचानक उद्भवलेल्या अनिश्चीततेच्या वातावरणात आज तुम्हा सर्वांसमोर सुमंत्र संस्थेचा ७ वा वार्षिक अहवाल सादर करीत आहे. २०१९-२०२० च्या गतिमान वाटचालीला अचानक एक मोठ्या गतिरोधकाला अडखळावे लागले. एव्हाना सर्वांच्या लक्षात आलेच असेल माझा रोख कुणाकडे आहे. "कोरोना" नावाच्या एका छोट्याश्या विषाणू ने जग भरात थैमान घातले आहे याची माहिती सर्वश्रुत आहेच. प्रत्येकाला कुठल्या ना कुठल्या रूपात त्याला तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळे संस्था सुद्धा अपवाद ठरली नाही.

२०२० चे नवीन आर्थिक वर्ष एप्रिल मध्ये सुरु होत असते. ते सुरु होण्यापूर्वीच मार्च महिन्यात भविष्यातील संकटाची चाहूल लागायला लागली. कोणत्याही प्रकारे खचून न जाता विश्वस्तांनी तातडीच्या बैठका घेऊन कामाचे नियोजन सुरु केले.

गरजू मुलांच्या शिक्षणासाठी काम करताना या महामारीच्या परिस्तिथीतीत आधी त्यांना कसली गरज भासत असेल याचा विचार करून , प्रथम रेशन किट मिळविण्याचे प्रयत्न केले. आपत्कालीन तातडीचे काही निर्णय सरकारला घ्यावे लागले. त्यापैकी महत्वाचा निर्णय म्हणजे करोना संसर्ग टाळण्यासाठी शाळा बंद ठेवणे. सुमंत्र संस्थेचे काम मुख्यत्वे करून वस्ती व शाळांमधून चालते. अशा परिस्थितीत शाळेत /वस्तीत जाणे शक्य नव्हते म्हणून सर्व कामे ऑनलाईन करण्याचे ठरले.

सदर अहवालात संस्थेने केलेल्या कामाचा तपशील दिलेला आहेच. सुमंत्र संस्थेच्या विश्वस्तांनी व स्वयंसेवकांनी चिकाटीने ऑनलाईन काम केले. नियमित पणे गूगल मीटिंग , झूम मीटिंग व लॉक डाऊन नसतांना वस्तीत जाऊन काम पूर्ण केले. या सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी आभार व समाधान व्यक्त करते.

कोविड काळात संस्थेला नियमित पणे आर्थिक मदत दिल्याबद्दल मी सर्व देणगीदारांची अत्यंत ऋणी आहे. A friend in need is a friend indeed या इंग्रजी वाक् प्रचारा प्रमाणे उर्मी संस्थेचे श्री. राहुल शेंडे व युक्रांद संस्थेचे श्री. संदीप बर्वे यांनी रेशन किट्स देऊन मोलाची मदत केली. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

करोना चे सावट दूर होऊन सर्व परिस्तिथी नेहमीप्रमाणे काम करण्यास अनुकूल असू दे अशी सद्भावना व्यक्त करून माझे मनोगत पूर्ण करते.

आपली आभारी ,

विनया भोसेकर
अध्यक्ष, सुमंत्र सायकॉलॉजिकल कौन्सेलिंग सेंटर

## सुमंत्र संस्था परिचय

'सुमंत्र' सायकॉलॉजीकल कौंसेलिंग सेन्टर ही स्वयंसेवी, सेवाभावी नोंदणीकृत संस्था आहे. संस्थेची स्थापना १४ नोव्हेंबर २००५ रोजी झाली. तेव्हापासून संस्था मानसिक आरोग्य व मुलांच्या शैक्षणिक समस्यांवर कोथरूड येथे काम करत आहे. २०१४ नोव्हेंबर मध्ये संस्थेची औपचारिक नोंदणी करण्यात आली.

**व्हिजन**: "शालेय अभ्यासात येणाऱ्या अडचणींवर मात करून मुलांचे शिकणे आनंददायी व्हावे आणि सर्वांचे मानसिक स्वास्थ्य सबलीकरण करावे."

**मिशन**: "अध्ययन अक्षमतेबद्दल असलेले अज्ञान निर्मूलन आणि मानसिक आरोग्य अज्ञान निर्मूलन करून जाणीव जागृती कार्यक्रम सर्वदूर पोहचविणे."

स्थापनेच्या वर्षापासून संस्था ५ निरनिराळ्या प्रकल्प/ उपक्रमांवर काम करत आहे.

## अक्षर मैत्री प्रकल्प:

शालेय अभ्यासात मागे पडण्याची अनेकविध कारणे असू शकतात. त्यापैकी अध्ययन अक्षमता हे एक कारण असू असते. ह्या अध्ययन अक्षमते मागे दडलेली वैद्यकीय किंवा मनो-वैद्यकीय कारणे कुशलपणे शोधून काढणे आणि त्यावर उपचारात्मक अध्यापन करणे असे आमच्या समुपदेशन केंद्राचे मुख्य काम आहे. असे करताना आम्ही पाल्य, त्याचे आई वडील व त्याचे शिक्षक यांच्यामध्ये महत्वाचा दुवा म्हणून काम करतो. यामुळे शाळा गळती, वर्तन समस्या ह्या गोष्टी कमी होण्यास हातभार लागतो. वस्ती तील मुलांना वस्तीत उपचारात्मक अध्यापनाची मदत मिळावी याचाही संस्था प्रयत्न करते व वस्तीत वर्ग चालवते व शाळेत उपचारात्मक वर्ग घेतले जातात, मुलांना उपचारात्मक अध्यापनाची मदत मिळावी यासाठी संस्था उपचारात्मक अध्यापनाचा शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करते.

## उपक्रम:

**सृजन आनंद**: ह्या उपक्रमांतर्गत अध्ययन अक्षम मुलांना शिकवण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करण्यात येते. ज्यामुळे मुलांना विविध प्रकारच्या गणिती किंवा भाषिक संकल्पना सोप्या पद्धतीने स्पष्ट व्हायला मदत होते.

**मानस:**

ह्या उपक्रमांतर्गत विद्यर्थ्यांच्या भावनिक आणि वर्तन समस्यांविषयी समुपदेशन केले जाते. विविध मानसिक चाचण्या उदा. बुद्ध्यांक, व्यक्तिमत्व, अभिक्षमता (aptitude) अशा चाचण्या घेतल्या जातात. प्ले थेरपी, आर्ट थेरपी व म्युझिक थेरपी पण घेण्यात येते.

**साकव:**

ह्या कार्यक्रमांतर्गत विवाह पूर्व, वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशनही केले जाते. ह्या तिन्ही अवस्थांमध्ये मनामनातील मतभिन्नता, व्यक्तिमत्वाचे विशिष्ट पैलू समज-गैरसमज आणि निरनिराळे मानबिंदू यामधील विचित्र गुंता प्रोफेशनल समुपदेशन पद्धतीने सोडवण्यासाठी प्रयत्न केला जातो आणि सुसंवादाचा साकव बांधला जातो.

**आविष्कार:**

ह्या उपक्रमांतर्गत सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी निरनिराळी शिबीरेही आयोजित केली जातात. ह्या मधे अभ्यास कौशल्ये, व्यक्तिमत्व विकास व कुमारवयीन समस्या अशा विविध गोष्टींवर भर दिला जातो.

**मन दर्पण:**

मन दर्पण उपक्रमांतर्गत मानसिक स्वास्थ्यावर काम चालते. या उपक्रमात सर्व वयोगटासाठी मानसिक समुपदेशन, मन सुदृढ करणाऱ्या विविध कार्यशाळा, मन विषयक चित्रपटांवर सामूहिक चर्चा, सकारात्मक मानसशास्त्रीय लेख, व्याख्यानं, संगीत उपचार, खेळातून उपचार इत्यादी उपक्रम घेतले जातात.













# सुमंत्र सायकॉलॉजीकल कौंसेलिंग सेंटर

# वार्षिक अहवाल २०२० -२०२१

## अक्षर मैत्री

अक्षर मैत्री प्रकल्पांतर्गत या वर्षी ऑनलाईन सेशन्स घेण्यावर भर दिला. कोविड संसर्ग मुलांना होऊ नये म्हणून यंदा जून महिन्यात शाळा सुरु करण्यात आल्या नाहीत. मार्च २०२० ला शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वीच सरकारी आदेशामुळे शाळा बंद करण्यात आल्या होत्या.

शाळांना एप्रिल-मे दरम्यान उन्हाळी सुट्टी असते. सुमंत्र संस्थे तर्फे मुलांशी व पालकांशी संपर्क केला असता लॉक डाऊन मुळे वस्तीतील व शाळेतील पालकांचे खूप हाल होत असल्याचे समजले. रोजच्या अन्नपाण्याची आबाळ होत असल्याचे कळले. तातडीने सुमंत्र संस्थेच्या रेमेडियल शिक्षिकांनी व विश्वस्तांनी इतर संस्थांशी संपर्क साधून मदत मिळवून दिली. उर्मी संस्थेकडून रेशन किट मिळाले व ते गोसावी वस्तीतील सम्राट शाळेच्या मुलांना वाटण्यात आले. त्यानंतर सुतारदारा वस्तीतील परिवारांना Yukrand संस्थे तर्फे रेशन किट देण्यात आले. एकूण ३० परिवारांना मदत देण्यात आली.











जुलै २०२० महिन्यापासून शालेय मुलांचे ऑनलाईन रेमेडियल वर्ग घेण्यात आले. मुलांकडून या वर्गासाठी उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. मुलं आधीच मेसेज करायची 'ताई आम्ही कृतीची तयारी केली आहे'. रांगोळी, कागद, जुनी वर्तमानपत्रे इत्यादी तयार ठेवायचे. या वर्गांना मुलांचे पालक पण सहभागी व्हायचे. एक मूल शिकतंय तर सर्व घर शिकतंय असा अनुभव आला.








बदलत्या काळाच्या गरजेनुसार सुमंत्र संस्थेतर्फे ऑनलाईन टीचर्स ट्रेनिंग कोर्स सुरु करण्यात आले. चेन्नई, नवी मुंबई आणि पुणे येथील महिलांनी हा कोर्स पूर्ण केला.

यु ट्यूब च्या माध्यमातून कोविड काळात उपयोगी पडतील अशा विषयांवर सुमंत्र संस्थे तर्फे वृषाली बिवरे यांनी संवाद माला तयार करून प्रसारित केली. मुलांच्या ऑनलाईन शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे, कोविड काळातील तणाव नियोजन अशा उपयुक्त विषयांवर व्हिडिओ क्लिप्स तयार करण्यात आल्या.

ऑगस्ट -सप्टेंबर दरम्यान झूम मीटिंग द्वारे शालेय शिक्षकांसाठी रेमेडियल शिक्षणाविषयी प्रबोधनात्मक सत्र घेण्यात आले. अध्ययन अक्षमता कशी ओळखायची, त्याची कारणे व उपाय, पालकांना याबाबतीत सजग कसे करावे इत्यादी विषयांवर माहिती देण्यात आली व शिक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे पण देण्यात आली. पहिल्या सत्रात ४० व दुसऱ्या सत्रात २५ शिक्षकांनी सहभाग घेतला.


शिक्षकांचा प्रतिसाद:

१. अतिशय उत्तम माहिती मिळाली. सहभागी शाळातील शिक्षकांना जाणवले की पालकांनाही या सत्राची आवश्यकता आहे.

२. सहज सोप्या भाषेत, शास्त्रोक्त माहिती दिली. धन्यवाद.

३. समस्या कळत होत्या पण त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला व त्या सोडविण्यासाठी उपलब्ध पर्याय कळले. खूप खूप धन्यवाद.

४. इंग्रजी माध्यमाच्या मुलांसाठी कोणत्या प्रकारे शिकवू शकतो ते सांगावे. या सत्रासाठी सेवा सहयोग संस्थेच्या टीम चे मोलाचे सहकार्य लाभले.





ऑक्टोबर २०२० संपूर्ण महिना Dyslexia Awareness करिता वेग-वेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. या वर्षी सुमंत्र संस्थे तर्फे या विषयी जाणीव जागृती साठी झूम मीटिंग घेण्यात आली. एस. एफ. पोसिटिव्ह मेंटल हेल्थ इन्स्टिट्यूट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने काही झूम वेबिनार घेण्यात आले. श्रीमती. वर्षा मिश्रा या मानसतज्ज्ञांनी DYSLEXIA - Understanding and Remedial Approach या विषयावर मांडणी केली व त्यासंदर्भात प्रश्नांची उत्तरं दिली.

सुमंत्र चे फेसबुक पेज आहे त्यात एकूण ३ रेमिडियल विद्यार्थ्यांची गोष्ट ऑक्टोबर २०२० महिन्यात प्रसारित करण्यात आली. या विद्यार्थ्यांबरोबर सुमंत्र संस्थेच्या रेमेडियल सेशन्स मुळे चांगली प्रगती दिसून आल्यामुळे गोष्टीरूपात त्यांची हकीकत सांगण्यात आली.
Psychosocial issues of LD हा लेख सुमंत्र संस्थेच्या मानसतज्ञ भावना शिराळकर यांनी फेसबुक पेज वर लिहिला. वरील सर्व उपक्रमांमुळे अध्ययन अक्षमतेविषयी जनसामान्यांमध्ये जाणीव पसरवण्यात संस्थेला यश आले.

ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ सातत्याने सुमंत्र संस्थेमार्फत निर-निराळ्या विषयांवर झूम वेबिनार आयोजित करण्यात आले.

## आविष्कार

सुमंत्र संस्थेच्या **'आविष्कार'** या उपक्रमांतर्गत विद्यार्थी कौशल्य विकास कार्यक्रम घेतले जातात. नोव्हेंबर महिन्यातील झूम वेबिनार ला स्वप्ना योगेश असेरकर पुण्यातील 'मंथन' संस्थेच्या मानसतज्ञ यांनी "सुमंत्र चा नवा अक्षर मंत्र-कोविड काळातील नवे अभ्यास तंत्र" हा विषय मांडला. त्यांनी विषयाची शास्त्रशुद्ध मांडणी केली आणि १० वी च्या विद्यार्थ्यांना कोविड च्या तणावपूर्ण काळात अभ्यास कसा करावा याचे उत्तम मार्गदर्शन केले. मुलांना अभ्यास करावासा वाटणे, हा महत्वाचा मुद्दा लक्षात घेवून निरनिराळ्या सूचना दिल्या. ऑनलाईन शिक्षणाचे फायदे सांगून बदललेल्या परिस्थितीचा कसा स्वतः ला उपयोग करून घ्यायचा याचे मार्गदर्शन केले. वेळेचे नियोजन, अग्रक्रम देऊन सर्व विषयांची उजळणी कशी करायची हे सांगितले. लॉक डाउन मुळे शाळेत जाता येत नाही, मित्र मैत्रिणींना भेटता येत नाही, सारखे घरात राहिल्यामुळे मुलांचा कोंडमारा होत आहे. असे वातावरण जरी असले तरी संधीचे सोने कसे करावे याबद्दल मौलिक सूचना असेरकर मॅडम कडून मिळाल्या व सुमंत्र चा प्रयत्न यशस्वी ठरला.




सौ. स्वप्ना योगेश असेरकर


## मन दर्पण

'पॉझिटिव्ह सायकॉलॉजी' ही मानसशास्त्राची शाखा अलीकडच्या काळात खूपच लोकप्रिय झाली आहे. कोविड मुळे निराशाजनक व नकारात्मक वातावरणात वाढ झालेली दिसतेय. फेसबुक पेज वर सकारात्मक लेख, कविता सादर करून लोकांचे मनोबल वाढविण्यास मदत होईल या दृष्टीने सुमंत्र ने नियमित संवादाचे सदर सुरु केले. सुमंत्र च्या सकारात्मक मानसशास्त्राच्या पानावर सर्वांशी संवाद साधायला श्रीमती. विमल ताई पाटील यांचा एक लेख आम्ही प्रसारित केला. त्यांचे वय ७७ वर्ष आहे. त्यांना कथालेखन कविता करणे वीणकाम आणि नवीन नवीन शिकणे याची आवड आहे. त्यांचे वामनराज प्रकाशन मध्ये लेख आणि कविता आलेल्या आहेत. कोरोना कडे बघण्याचा त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन त्यांच्या या लेखात व्यक्त केला आहे. ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देणारा असा त्यांचा लेख परिणामकारक ठरला.

फेसबुक पेज वर इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमधून लेख लिहिण्यास सुरुवात केली. या सदरामध्ये सकारात्मक भावना आशा, स्मितहास्य, संगीत उपचार पद्धती, सहिष्णुता, कृतज्ञता असे अनेकविध लेख व कविता सुमंत्र च्या सभासदांनी लिहिले.

आपल्यातल्या सकारात्मक घटकांची आपल्याला जाणीव करून देण्यात या प्रकारचे लेख उपयुक्त ठरले, 'आपल्या कमतरता व आपले चांगले गुण यात समतोल सांभाळायला हवा हे कळले', 'समस्या समूळ नष्ट होणार नाही पण त्या सुसह्य तर नक्कीच होतील' ................अशा प्रतिक्रिया मिळाल्या.

सुमंत्र संस्थेमार्फत 'ऍडव्हान्स सेल्फ अवेअरनेस' कार्यशाळा फेब्रुवारी २०२० मध्ये पुण्यात घेण्यात आली. कडक लॉक डाउन व कोविड संसर्ग टाळण्यासाठी काही महिने ही कार्यशाळा पूर्ण करता आली नाही. पुन्हा काही दिवस ऑनलाईन घेण्यात आली. फेब्रुवारी २०२१ मध्ये हे ट्रेनिंग पूर्ण करून सर्व सहभागी महिलांना सर्टिफिकेट देण्यात आले. स्वतः ला सक्षम करून स्वतःचे व्यक्तिमत्व सुदृढ करण्यास या कार्यशाळेची खूप मदत झाली, आत्मविश्वास वाढला, समस्या हाताळण्याची हातोटी वाढली, सकारात्मक विचारसरणी वाढली असे अनेकविध प्रतिसाद
महिलांकडून मिळाले. एक मजबूत सकारात्मक स्वयं प्रतिमा तयार करण्यात ही कार्यशाळा यशस्वी झाली.






'ऍडव्हान्स सेल्फ अवेअरनेस' कार्यशाळा घेताना सौ. रेश्मा अलुरकर

**'मन दर्पण'** अंतर्गत झूम वेबिनार घेण्यात आले.


विस्मरणाचे स्मरण:

डिमेंशिया सारख्या आजारांबाबत आपल्याकडे फारशी जागृती नाही. म्हातारपण आले की स्मरणशक्ती कमी होते असे सगळे गृहीत धरतात. विसराळूपणा हा चेष्टेचा विषय होतो असे होऊ न देता त्यामागची शास्त्रीय कारणे समजावून घेऊन समाजात प्रबोधन वाढविण्याच्या दृष्टीने सुमंत्र संस्थेने हा कार्यक्रम आयोजित केला.

सुमंत्र संस्थेच्या 'मन दर्पण' उपक्रमांतर्गत,ज्येष्ठांच्या विस्मरणाच्या समस्येविषयी सविस्तर जाणून घेण्याकरिता माननीय डॉ. मंगला ताई जोगळेकर यांना आमंत्रित केले. या क्षेत्रात मंगला ताई गेली २५ वर्षे कार्यरत असून त्यांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे.

विस्मरणा मागची कारणे, त्याचे प्रकार, त्याचे व्यवस्थापन, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय असे सविस्तर विवेचन त्यांनी या व्याख्यानात मांडले. औषधोपचार व मानसोपचाराची आवश्यकता सांगितली. अशा व्यक्तींची काळजी घेणाऱ्या घरातील लोकांवर विशेष जवाबदारी येते. अशा व्यक्तींची सुरक्षितता, आहार, स्वच्छता, याबाबत कशी काळजी घ्यावी ते सांगितले.


मेंदूला व्यायाम देणाऱ्या खेळांचे प्रकार व महत्व उदाहरणे देऊन समजावले. या आजारात रुग्णांचा जेवढं कस लागतो तेवढाच कस त्यांचा सांभाळ करणाऱ्यांचा लागतो याकरिता मंगला ताईंनी सपोर्ट ग्रुप्स सुरू केले आहेत. डिसेंबर २०२० महिन्यातील या वेबिनार मध्ये ज्येष्ठांमधील विस्मरणाच्या समस्येविषयी खूप उपयुक्त माहिती मिळाली व समाजात या विषयी प्रबोधन करण्याची खूप गरज असल्याचे अनेकांनी मत व्यक्त केले. निवृत्तीचं आयुष्य मेंदूसाठी आव्हानात्मक आणि आनंददायी असेल याकडे लक्ष देणे कसे आवश्यक आहे हे सर्वांपर्यंत पोहोचले.






डॉ. मंगला ताई जोगळेकर

जानेवारी २०२१ महिन्यातील वेबिनार मध्ये डॉ. संज्योत देशपांडे यांनी 'आयुष्याला हो म्हणा' या विषयावर संवाद साधला. डॉ. संज्योत देशपांडे या मनःस्वास्थ्य क्षेत्रात मानसतज्ञ म्हणून कार्यरत आहेत. विविध मासिकातून व वर्तमानपत्रातून त्यांचे मानस शास्त्र विषयक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी "अटळ दुःखातून सावरताना" हे वियोग या विषयीचे पुस्तक प्रकाशित केले आहे. या सत्रात लोक आत्महत्या का करतात याची सविस्तर कारणमीमांसा केली. तिमिरातून तेजा कडे कसे जावे यावर मार्गदर्शन केले. कितीही निराश वाटले तरी आयुष्याकडे पाठ ना फिरवता आयुष्याला सामोरे जायचे या बद्दल खूपच संवेदनशील मार्गदर्शन केले.




डॉ. संज्योत देशपांडे

फेब्रुवारी२०२१ महिन्यातील वेबिनार मध्ये “म्युझिक थेरपी” या मानस शास्त्रातील नवीन शाखे विषयी माहिती देण्यात आली. सुमंत्र संस्थेच्या विश्वस्त सौ. वृषाली बिवरे यांनी ही संकल्पना काय आहे, मनःस्वास्थ्य व शारीरिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी याचा उपयोग कसा होतो हे अनेक उदाहरणे देऊन, प्रात्यक्षिक घेऊन उत्तम कार्यक्रम सादर केला.




सौ. वृषाली बिवरे

या उपचारात्मक मानस तज्ञ आहेत. रुग्णांच्या आवश्यकतेनुसार फ्लॉवर थेरपी, योग थेरपी, व संगीत उपचार थेरपी देण्याचा त्यांना अनुभव आहे. हा कार्यक्रम ऐकल्यावर काही जणांनी उपचार घेण्यासाठी संस्थेशी संपर्क साधला. यातच या कार्यक्रमाची आवश्यकता व यश सामावले आहे.

२०२१ मार्च महिन्यातील झूम वेबिनार चे शीर्षक होते “चला ठरवूया आपल्या जीवनाचे ध्येय". ऋचा अवटी यांनी हे सत्र घेतले. जगातील जवळ जवळ ९५% लोकं ध्येय निश्चिती ही किचकट बाब समजून ती करण्याची टाळाटाळ करतात. ऋचा अवटी गेली अनेक वर्षे प्रशिक्षण देणाऱ्या NLP प्रतिथयश प्रशिक्षक आहेत. त्यांना १२ वर्षांचा मीडिया मार्केटिंगचाही अनुभव आहे. व्यक्तिमत्व विकासासाठी खूपच उपयुक्त विषय निवडल्याची उत्स्फूर्त दाद सर्व सहभागी श्रोत्यांनी दिली.



ऋचा अवटी

## इतर उपक्रम

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ ही महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागांतर्गत २७ जानेवारी १९६७ रोजी स्थापन केलेली संस्था आहे. “बाल भारती” या नावाने ती ओळखली जाते. महाराष्ट्रातील अनेक शाळांमधून “बाल भारती” ची पुस्तके वापरली जातात. २८ फेब्रुवारी २०२१ विज्ञान दिनानिमित्त सुमंत्र संस्थेच्या माजी सचिव अपर्णा धर्माधिकारी यांना ‘बाल भारती’ ने अध्ययन अक्षमता या विषयी शालेय शिक्षकांसाठी मार्गदर्शन करण्यास आमंत्रित केले होते. या निमित्ताने सुमंत्र संस्थेच्या अध्ययन अक्षमता क्षेत्रातील कामाबद्दल ७५० शाळांपर्यंत माहिती पोहोचली.

७ फेब्रुवारी २०२१ ला सेवा सहयोग संस्थेमार्फत सुमंत्र संस्थेच्या कार्यकर्त्यांसाठी एक शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यकर्ता कसा असावा? त्याचे काम संस्थेसाठी परिणामकारक कसे करावे? सुमंत्र व सेवा सहयोग एकत्रित वस्तीत काय काय काम करू शकतील? इत्यादी विषयांवर अनौपचारिक चर्चा घेण्यात आली. मार्गदर्शन करण्यास श्री. अतुल नागरसजी, श्री शैलेश घाटपांडेजी, श्री. मकरंदजी, श्री. मल्लेशजी उपस्थित होते.



ह्या वैचारिक चर्चेमुळे सुमंत्र चा स्वयंसेवकांचा काम करण्याचा उत्साह अधिक वाढला आणि शिबिराचा उद्देश सफल झाला अशी पोचपावती सर्वांकडून मिळाली.

सुमंत्र संस्थेच्या वस्तीतील रेमिडियल वर्गांकरिता एक छोटी खोली भाडे तत्वावर घेण्यात आली आहे. वस्तीतील पालकांच्या मीटिंग, काही ट्रेनिंग इत्यादी करिता ही जागा उपयुक्त ठरते आहे. या जागेत मुलांसाठी वाचनालय सुरु करण्यात आले आहे. मुलांना काही फिल्म्स पण दाखविल्या. लवकरच वस्तीतील कौटुंबिक समस्या निवारण करण्यासाठीही हे केंद्र कार्यरत होणार आहे.










EXTENCIA या आय टी कंपनी कडून ९ कंप्युटर सेट्स ची देणगी जानेवारी २०२१ महिन्यात मिळाली. हे सेट्स सुमंत्र संस्था ज्या शाळां मध्ये व वस्तीत काम करते तिथे शालेय मुलांकरिता दिले. तसेच दत्तात्रय फाऊंडेशन या संस्थेला २ कंप्युटर सेट्स दिले.






२० नोव्हेंबर २०२० रोजी सुमंत्र संस्थेची वार्षिक जनरल बॉडी सभा गूगल मीटिंग द्वारे घेण्यात आली. या दिवशी उत्तम व कल्पक रेमिडियल शिक्षिका कीर्ती नारखेडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना १००१/- रुपये मानधन व डॉ. मनीषा कावतकर स्मृती प्रित्यर्थ एक मानचिन्ह देण्यात आले.





कीर्ती नारखेडे यांचा सत्कार करताना अपर्णा धर्माधिकारी व वैशाली बढे आणि सुमंत्र सभासदांचा ऑनलाईन सहभाग

सुमंत्र ने अक्षरमंत्र हे उपचारात्मक अध्यापन साठी उपयुक्त ठरतील अशा पुस्तकांची रचना केली आहे. उपचारात्मक अध्यापन करतांना अनेक कृतींद्वारे अभ्यासकौशल्ये विकसित करण्यावर भर दिला जातो. ह्या कृतींचा परिचय या पुस्तकांत दिला आहे. अध्यापन करतांना शिक्षकांना याचा नक्कीच उपयोग होईल. मुलांना सुद्धा रंजक आणि विचारपूर्वक कृती करून शिकता येईल असा विचार करून अक्षरमंत्र ही पुस्तके प्रकाशित करायचे ठरले. ऑक्टोबर २०२१ मध्ये ही पुस्तके शिक्षकांसाठी उपलब्ध असतील.




२० नोव्हेंबर २०२० या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पुढील पाच वर्षांकरिता संस्थेच्या नवीन कार्यकारिणी ची निवड करण्यात आली.

LIST OF DONORS (2020-21)

| NO. | NAME OF DONOR | AMOUNT IN Rs |
|---|---|---|
| 1. | SHRI. ANISH SHIRALKAR | 2000 |
| 2. | ARUNA CHANDRASHEKHAR | 60000 |
| 3. | SHRI. ARVIND KRISHNAJI PATIL | 2500 |
| 4. | SUNITEE RAJENDRA BHAGLI | 5000 |
| 5. | S. GAYATRI | 20000 |
| 6. | SHRI. L. R. GANESHAN | 60000 |
| 7. | SHRI. RAJENDRA KAWATKAR | 10000 |
| 8. | SHRI. RAMDAS VILAS DESHPANDE | 2001 |
| 9. | SHRI SHRIRAM KELKAR | 10000 |
| 10. | SEVA SAHAYOG | 63900 |
| 11. | SHRI. SHRIDHAR BHAGWAN JAHAGIRDAR | 10000 |
|  | TOTAL | 2,45,401 |

## सुमंत्र संस्थेच्या २०२०-२१ सर्व उपक्रमात व प्रकल्पात सहभागी स्वयंसेवक

वैशाली बढे

अपर्णा धर्माधिकारी

निकिता देशपांडे

अनिता घाटणेकर

वृषाली बिवरे

आसावरी गोगटे

सुकन्या कुलकर्णी

प्रज्ञा वाघ

श्रुती यज्ञोपवीत

जान्हवी कुळकर्णी

रेश्मा अलुरकर

यशश्री हुद्दार

सीमा गुंड

भावना शिराळकर

अनुष्का कुलकर्णी

श्रुती काळे

कल्याणी शिंदे

अविनाश भोसेकर

सारस देशपांडे

## सुमंत्र संस्थेच्या उपक्रमात संस्थात्मक सहभाग

सेवा सहयोग

EXTANCIA

युक्रांद

उर्मी

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950
SCHEDULE IX [Vide Rule 17(1)]
SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTER
OFFICE NO. 5, SATYA-VILLA BUILDINGS, OPP. EKLAVYA POLYTECHNIC, KOTHRUD PUNE 411038

## INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2021

| EXPENDITURE | Sch. | 31.03.2021 | 31.03.2020 | INCOME | Sch. | 31.03.2021 | 31.03.2020 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Opening Stock | | 19,215.00 | 20,895.00 | | | | |
| Expenditure in respect of the Property | | 0.00 | 0.00 | By Rent | | 0.00 | 0.00 |
| Establishment Expenses | B | 7,608.90 | 1,915.80 | By Interest on Fixed Deposit with Banks | | 2,843.00 | 2,787.00 |
| Remuneration to Trustees | | 0.00 | 0.00 | By Interest on Saving Bank | | 0.00 | 0.00 |
| Legal Expenses | | 0.00 | 0.00 | By Donation | | 2,45,401.00 | 2,46,302.00 |
| Audit Fees | | 6,500.00 | 6,500.00 | By Income from Other Sources | A | 76,000.00 | 1,84,560.00 |
| Depreciation & Assets write off | G | 7,924.00 | 9,830.00 | | | | |
| Expenditure on Object of the Trust | C | 2,08,006.00 | 3,97,628.00 | By Closing Stock | | 16,275.00 | 19,215.00 |
| Excess of Income over Expenditure | | 91,265.10 | 16,095.20 | | | | |
| TOTAL | | 3,40,519.00 | 4,52,864.00 | TOTAL | | 3,40,519.00 | 4,52,864.00 |

AS PER OUR REPORT OF EVEN DATE

ACE: PUNE
TE : 14/09/2021
IN : 21148366AAAABM5656

SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTER
TRUSTEE (Secretary) TRUSTEE (Treasurer)

SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTRE ★ Kothrud, Pune ★ Reg. No. Mah. 1991/2014 Pune Reg. No. F/45073/Pune

VEDVATI V. LELE
CHARTERED ACCOUNTANT

VEDVATI V. LELE ★ CHARTERED ACCOUNTANT ★ M. No. 148366

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950
SCHEDULE IX [Vide Rule 17(1)]
SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTER
OFFICE NO. 5, SATYA-VILLA BUILDINGS, OPP. EKLAVYA POLYTECHNIC, KOTHRUD PUNE 411038

BALANCE SHEET AS ON 31.03.2021

| FUNDS & LIABILITIES | Sch. | 31.03.2021 | 31.03.2020 | PROPERTY & ASSETS | Sch. | 31.03.2021 | 31.03.2020 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TRUST FUNDS & CORPUS | D | 49,200.00 | 42,000.00 | FURNITURE FIXTURE AND OTHER ASSETS | G | 43,461.00 | 37,785.00 |
| LOANS (SECURED OR UNSECURED) | | 0.00 | 0.00 | INVESTMENTS | H | 59,958.00 | 51,115.00 |
| CURRENT LIABILITIES & PROVISIONS | E | 11,750.00 | 45,416.00 | CASH & BANK BALANCES | I | 1,58,354.90 | 1,08,134.80 |
| INCOME & EXPENDITURE A/C | F | 2,27,098.90 | 1,35,833.80 | OTHER CURRENT ASSETS | J | 26,275.00 | 26,215.00 |
| **TOTAL Rs.** | | **2,88,048.90** | **2,23,249.80** | **TOTAL Rs.** | | **2,88,048.90** | **2,23,249.80** |

**The above Balance Sheet to the best of my belief contains a true account of the Funds & Liabilities and of the Property and Assets of the Trust.**

**AS PER OUR REPORT OF EVEN DATE**

SUMANTRA PSYCHOLOGICAL COUNSELING CENTRE ★ Kothrud, Pune ★ Reg. No. Mah. 1991/2014 Pune Reg. No. F/45073/Pune

TRUSTEE

TRUSTEE

**VEDVATI V. LELE**
**CHARTERED ACCOUNTANT**

VEDVATI V. LELE ★ CHARTERED ACCOUNTANT ★ M. No. 148366

**PLACE: PUNE**
**DATE : 14/09/2021**
**UDIN : 21148366AAAABM5656**

## संस्थेचे विश्वस्त मंडळ (Board of Trustees)



| | | |
|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | विनया अविनाश भोसेकर |
| 2 | उपाध्यक्ष | अनिता अजय घाटणेकर |
| 3 | सचिव | निकिता सारस देशपांडे |
| 4 | कोषाध्यक्ष | वैशाली संजय बढे |
| 5 | सभासद | अपर्णा समीर धर्माधिकारी |
| 6 | सभासद | वृषाली मयुरेश बिवरे |
| 7 | सभासद | श्रुती शिरीष काळे |


## संस्थेचे जनरल बॉडी मेंबर्स


| | |
|---|---|
| 1 | डॉ. मेघा क्षीरसागर |
| 2 | आसावरी गोगटे |
| 3 | जान्हवी कुळकर्णी |
| 4 | दीपाली नेमाडे |
| 5 | संध्या पन्हाळकर |
| 6 | शैलजा जोशी |
| 7 | श्रुती यज्ञोपवीत |
| 8 | सुकन्या कुलकर्णी |


## आमचे प्रकाशन:






## आमचा पत्ता:

ऑफिस नंबर ५, “सत्यविला” अपार्टमेंट्स, एकलव्य पॉलिटेक्निक समोर,
कोथरूड, पुणे-४११०३८.
दूरध्वनी: ८४०८८४०६१६

Website: www.sumantra.center
FB page: www.facebook.com/Sumantra Psychological Counseling Center
Email: sumantracounselling@gmail.com